ात मने या
ीने, मला
ाडेल असे

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतांना डॉ.कलमांची प्राणज्योत मालवली! एक सच्चा शिक्षक, महान देशभक्त, प्रेरणादायी

जयंतीदिनी नवा, स्वावलंबी, सहिष्णू, प्रज्ञावंत भारत घडविण्याचा संकल्प करूयात! जय हिंद! जय भारत!

# स्पर्धा परीक्षेत हमखास यशासाठीचा दस्तावेज : ज्ञानराज मराठी व्याकरण

**पुस्तक परिक्षण**

**प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी**

मो.नं. ९२८४७ ०७५३२

आमचे सन्मित्र प्रा.ज्ञानेश्वर आघाव ( ज्ञानराज अकॅडमी, बालिकाश्रम रोड, अहमदनगर ) गत पंधरा वर्षापासून ते स्वतंत्र अकॅडमीच्या माध्यमातून हे स्पर्धा परीक्षा अध्यापन करतात, मराठी व्याकरणावर सूक्ष्म निरीक्षण मांडणारे ते जाणकार अभ्यासक आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी आज शासकीय निमशासकीय विविध पदावर कार्यरत आहेत, त्यांनी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी ज्ञानराज मराठी व्याकरण' यावर अभ्यासपूर्ण ग्रंथ आकारास आणला आहे. भाषा आणि माणूस यांचं अतूट नाते आहे. भाषा खरेतर अनेक मानवी समूहाला जोडणारा तो एक पूल आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासात भाषा महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. म्हणूनच चाकाच्या शोधापेक्षा भाषेचा शोध खूप महत्त्वाचा मानला जातो. कोणत्याही भाषेची शास्त्रीय बैठक ही तिच्या व्याकरणावर आधारीत असते. व्याकरण हा भाषेचा कणा आहे, असे मानल्यास वावगे ठरणार नाही. भाषेतील चौदाखडीपासून ते वाक्य, शब्द संग्रहाची शास्त्रीय माहिती असावी लागते. अलीकडच्या काही वर्षांमध्ये अनेक ज्ञानशाखा निर्माण झाल्या तर काही ज्ञानशाखा मागेही पडल्या. पण या घडामोडीत भाषेचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकच ठळकपणे अधोरेखित होत गेले. भाषा कधी माध्यम तर कधी साधन बनून ज्ञानक्षेत्रांच्या विकासात मौलिक योगदान देत राहिली. परंतु भाषेच्या क्षमतांचा, तिच्या सर्वस्तरीय उपयोजनाचा स्वतंत्र विचार होताना दिसत नाही. तो झाला पाहिजे.

ऋआकृतिबंध :- भाषा, तिची पूर्वपीठिका, शब्द निवडीपासून ते लिंग, वचन,काळ, संधी, समास आणि जनरल नॉलेज या मूलभूत घटकांचा यांत समावेश केला आहे. भाषेवर प्रभुत्व संपादन करून कोणतीही व्यक्ती सर्वांगीण प्रगती करू शकते. विविध क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरू शकते. त्यासाठी भाषा आणि भाषिक कौशल्यांचे शिक्षण खूप आवश्यक आहे. ते घेऊन व्यक्ती स्वत:चा विकास करून घेऊ शकते. सर्वच भाषिक कौशल्ये विविध क्षेत्रात काम करण्यासाठी आत्मविश्वास देतात. व्याकरणविषयक अगदी सोप्या भाषेतून विविध संकल्पना स्पष्ट आणि उपयोजित लेखनावर आधारित परिपूर्ण माहिती व्हावी, याहेतूने ज्ञानराज मराठी व्याकरण' याकरीता संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्ञानराज मराठी व्याकरण' हा ग्रंथ स्पर्धा परीक्षाची तयारी करणाऱ्या तमाम अभ्यासकांसाठी असलेला हा ग्रंथ तीर्थरूप आक्कास (आईस) मनोभावे अर्पण केला आहे. ध्येयवादी तरुण पिढीसमोर निर्माण केलेले आशावादाचे चित्र या ग्रंथाची जमेची बाजू असल्याचे त्यात दिसते. केवळ हा ग्रंथ वाचनीय नाही, तर दिशादर्शक आहे ते वाचून नवी शक्ती, उमेद आणि लढण्याची वृत्ती वाढते. थोडक्यात प्रा.ज्ञानेश्वर कांताबाई सुभाषराव आघाव यांनी विद्यार्थ्यांसाठी सोप्या भाषेतून व्याकरणाची तयारी व्हावी यासाठी परिपूर्ण एकच असे पुस्तक लिहिलेले आहे.

*निर्मितीमूल्य :- आकर्षक मुखपृष्ठ, सुंदर छपाई अशा बहिरंग व अंतरंगाने नटलेल्या या दस्तावेजाची, अभ्यासकाना पाहताक्षणीच भुरळ पडली नाही, तरच नवल ! पुस्तकाचा आकृतिबंध आहे. भाषेचा आरंभ-मध्य-शेवट, व्याकरणाची आवश्यकता, विषय घटक मांडणी, व्याकरणिक मापदंडातून ती दर्जेदार कलाकृती ठरली असून स्पर्धा परीक्षाची दिशा निश्चितच यातून प्राप्त झालेली आहे, असा आशावाद वाटतो. त्यांच्या साहित्यिक प्रवासास अनेकोत्तम शुभेच्छा खख

लेखक : प्रा.ज्ञानेश्वर आघाव / ज्ञानराज मराठी व्याकरण/ पृष्ठे : २४८ , मूल्य : २४० /-
संपर्क मो:- ८६९८ ९४४०९१
मुखपृष्ठ:अभिजित कुंभार
प्रकाशक-नितेश सूर्यवंशी-रडीकॅल पब्लिकेशन, पुणे

डत आहे
:.तो सुदृढ
पाहिजे.
स्कृतिक,
ने केलेला
भारताचा

भारतीय
ांस्कृतिक
ा सुरुंग
अतिशय
कुजबुज
जाहीरता
ारी केवळ
काँग्रेसची
। स्वातंत्र्य
ाह होता

.ती म्हणजे ( १) देशाच्या विविध भागातील राष्ट्रवादी राजकीय कार्यकर्त्यांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यास उत्तेजन देणे .(२) जात, धर्म, प्रांत भेद विरहित राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचा विकास करणे.(३) महत्त्वाच्या निगडीच्या प्रश्नांवरील लोकांच्या मागण्या सरकार पुढे मांडणे.(४) देशात विविध प्रश्नांवर लोकमत तयार करणे आणि त्यांचे संघटन करणे. ब्रिटिश राजवटीच्या काळात ब्रिटिशांविरोधी लढ्याचा तो एक राजकीय आवाज होता. आज भारत जोडो यात्रा एतद्देशीय सरकारच्या हुकूमशाही व मनमानी धोरणाविरोधात आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना स्वातंत्र्याच्या सर्व मूल्यांची मोडतोड व तोडफोड केली जात आहे.या पार्श्वभूमीवर अनेक अर्थाने महत्त्वाची ठरू शकते.

गीते ,स्वातंत्र्याचे पोवाडे, व्याख्याने, शिबिरे या आधारे काँग्रेस सेवा दलाने अतिशय भरून स्वरूपात काम केले. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस सेवा दल संघटनेची गरज असून सुद्धा ती दुर्लक्षित आणि कमजोर झाली. पक्षीय कार्यकर्त्यांच्या प्रबोधनाकडे, सेवावृत्तीकडे ,दलवृत्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे काँग्रेसची पक्ष म्हणून कमालीची दुरावस्था झाली. आज झालेली अवनती हे त्याचेच कारण आहे. म्हणूनच भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने काँग्रेसने पक्ष म्हणून उभारी घेण्याबरोबरच काँग्रेस सेवा दलाची उभारणीही करण्याची गरज आहे. नव्याने निवडून येणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. भारत जोडो यात्रेतून हा संदेश स्वीकारणे ही पक्ष नेतृत्वाची, पक्षाची आणि आजच्या अस्वस्थ

सकाळ TODAY

औरंगाबाद, रविवार,
१७ जुलै २०२२

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रासेयो पुरस्कार जाहीर



कळंब (प्रदीप यादव): राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या वतीने (२०१९-२०२०) सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयास जाहीर झाला आहे. तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रशंसा पुरस्कार (२०१७-१८) प्रा. डॉ.दीपक सूर्यवंशी जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट रासेयो कार्यक्रमाधिकारी पुरस्कार- प्रा. ईश्वर राठोड, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार अनिकेत बोर्डे या विद्यार्थ्याला जाहीर झाला आहे. सदर पुरस्काराचे वितरण २६ जुलै रोजी विद्यापीठ नाट्यगृहात होणार आहे. सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्ञानप्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, प्राचार्य डॉ. सुनील पवार यांनी अभिनंदन केले आहे. तसेच डॉ. व्ही एस अनिगुंठे, उपप्राचार्य डॉ. हेमंत भगवान, प्रा. डॉ.के डी जाधव, प्रा. डॉ. दादाराव गुंडरे, प्रा. डॉ. डी एस जाधव, प्रा. डॉ.एल.एम.थोरात, प्रा. डॉ. के डब्ल्यू. पावडे ,प्रा. डॉ. आर व्ही ताटीपामुल, प्रा. एन जी साठे, डॉ. संदीप महाजन, प्रो.डी.एन. चिंते, प्रा.डॉ.जयवंत ढोले, प्रा. डॉ.बालाजी वाघमारे, ग्रंथपाल प्रा अनिल फाटक, सहायक ग्रंथपाल श्री अरविंद शिंदे, श्री संतोष मोरे, श्री हनुमंत जाधव तसेच शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही अभिनंदन केले आहे.

Scanned with CamScanner

# काव्यसंग्रह आणि ग्रंथाचे कळंबमध्ये प्रकाशन



प्रतिनिधी । कळंब

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे लिखित उजेडवाटा या कवितासंग्रह व प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी लिखित रंगनाथ तिवारी व्यक्ती आणि वाङ्मय या वैचारिक ग्रंथाच्या प्रकाशन समारंभ संपन्न झाला.

मोहेकर महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहातव्यासपीठावर ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक भास्कर चंदनशिव, ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, मंडळाचे संचालक डॉ. ज्ञानोबा जाधव, प्राचार्य डॉ. सुनील पवार, प्रा. डॉ. हरिदास फेरे, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष परमेश्वर पालकर, प्रा. डॉ. दादाराव गुंडरे, डॉ. दीपक सूर्यवंशी उपस्थित होते.

प्रास्ताविक गुंडरे व सुर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. केदार काळवणे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. कमलाकर जाधव यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी व साहित्यप्रेमी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

वाणिज्य वार्ता दै. दिव्य मराठी ०१११०२१

# शैक्षणिक क्षेत्रातील मानदंड : डॉ. अशोकराव मोहेकर



पुण्य नगरी

# मोहेकर महाविद्यालयाचा पुरस्काराने सन्मान



**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**कळंब:** शहरातील शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा सन २०१९- २० चा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रमोद येवले, रासेयो राज्य समन्वयक प्रमोद वणजे, माजी संचालक टी.आर. पाटील, रासेयो संचालक डॉ.आनंद देशमुख यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. दिपक सूर्यवंशी यांना रासेयो प्रशंसा कार्यक्रमाधिकारी, प्रा. ईश्वर राठोड यांना कार्यक्रमाधिकारी पुरस्कार तर सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार अनिकेत बोर्डे या विद्यार्थ्याला प्रदान करण्यात आला. मोहेकर महाविद्यालयास पुरस्कार मिळाल्याने संस्थेचे सचिव डॉ. अशोक मोहेकर यांनी प्राचार्य व प्राध्यापकवृंदाचे कौतुक केले.

Smart Osmanabad
Page No.3 July 30, 2022

पुरस्कार प्राप्त व पीएचडी प्राप्त डॉ. साधना मडके, येरमाळा बीट मधील पानगाव जिल्हा शिक्षका विजयश्री वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पांगळ जगताप, राणी लोमटे, जया नगोषे, होसालमल, सोनी चिंचकर यांची उपस्थिती होती.

# प्रा. डॉ. गुंडरे आणि डॉ. सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



प्रा. डॉ. दादाराव गुंडरे प्रा. डॉ. दिपक सूर्यवंशी

कळंब, दि. ३१ (प्रतिनिधी) - शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयातील मराठी विभागातील अनुक्रमे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. दादराव गुंडरे यांच्या 'उजेडवाटा' काव्यसंग्रहास अरूण काळे राज्यस्तरीय तर प्रा.डॉ. दिपक सूर्यवंशी यांच्या 'रंगनाथ तिवारी : व्यक्ती आणि वाङ्मय' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अनुदान प्राप्त समीक्षा ग्रंथास जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा रा. ग. जाधव राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नागपूर येथील दीक्षाभूमीच्या सभागृहात २७ मार्चला प्रमुख पाहुणे महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे, डॉ. रवींद्र तिरपुडे, भदंत नागार्जुन सुरई ससाई, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, मंगलोरच्या हिंदी विभागप्रमुख डॉ.सुमाटी रोडनवर मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

त्याबद्दल त्यांचे संस्थेच्या कार्यालयात ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष प्रा.आबासाहेब बारकुल व सचिव डॉ.अशोकराव मोहेकर, तसेच प्राचार्य डॉ.सुनील पवार, उपप्राचार्य डॉ. हेमंत भगवान, प्रा. सतिश लोमटे, प्रा.डॉ.संजय कांबळे, प्रा.डॉ. के. डी. जाधव, डॉ.एल.एम.थोरात, प्रा डॉ नामानंद साठे, प्रा. ईश्र्वर राठोड, प्रो. डी एन चिंते, प्रो.एम.डी. गायकवाड आदींनी अभिनंदन केले आहे.

# वसानिमित्त पाणपोईचे उद्घाटन



सध्या अतीशय कडक उन्हाळा जाणवत आहे त्यामुळे अंगाची लाही, लाही होत आहे. अशावेळी ग्रामिण भागांतुन आलेल्या लोकांना या पाणपोईमुळे शुद्ध व थंडगार जारमधले पिण्यासाठी पाणी मिळणार आहे. ही पाणपोई लोकांसाठी अतीशय उपयुक्त ठरणार आहे.

हेब बनसोडे, तानाजी जाधव, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे आदीजन उपस्थित होते. प्रारंभी संजीवनी मेडीकल स्टो... फार्मा ग्रुपच्या वतीने ... जाधव व अजय ... त्यांच्या सहकाऱ्यांनी ... सत्कार केला. सुत्रसंचल... हर महाविद्यालयाचे प्रा. एम. बी.

लोकमत

# शैक्षणिक क्षेत्रातील दीपस्तंभ : ज्ञानदेव मोहेकर गुरुजी



शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीण परिवर्तनासाठी प्रयत्नशील, तत्वनिष्ठ, आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजेच ज्ञानतपस्वी, पूज्य कै. ज्ञानदेव मोहेकर गुरुजी (आण्णा) यांचा आज स्मृतिदिन. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी आयुष्य खर्ची घालणारे शैक्षणिक क्षेत्रातील दीपस्तंभ म्हणून नामोल्लेख केला जात असलेल्या ज्ञानदेव भाऊराव मोहेकर उर्फ आण्णांचा एका संस्कारसंपन्न, सामान्य परिस्थिती असलेल्या शेतकरी कुटूंबात जन्म झाला. त्यांच्या निरक्षर आईची आपल्या मुलाने खूप शिकावे ही इच्छा, त्याकरिता आईने एक समई विकत घेतली. माझा मुलगा शिकेल व पोथी वाचेल! अशी त्यामागची प्रेरणा पुढं आण्णांनी सार्थ करून दाखविली.

बालपणीच मातृछत्र हरवल्यानंतर अडीच वर्षापासून आईविना जीवन जगण्यास सुरुवात करावी लागली. वडील धार्मिक, परोपकारी वृत्तीचे सद्गृहस्थ होते. तेच अनुवंशिक संस्कार त्यांच्यावर झाले.

दहावीपर्यंतचे शिक्षण मामाच्या गावी तर हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातून बी.एस्सी.(कृषी) पदवी संपादन केली. त्यानंतर अनेक उच्च संधी ठोकरत ग्रामीण भागात राहून शिक्षकी पेशा स्वीकारत सर्वसामान्यांचा उद्धार करावा या हेतूने अविरत ज्ञानदानाचे कार्य केले.

शिक्षण हे पवित्र कार्य, त्याद्वारेच खरे समाजपरिवर्तन होते यांवर दृढ विश्वास असलेल्या मोहेकर गुरूजींनी पुढं येरमाळा येथे २५ सप्टेंबर १९५१ रोजी ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेची स्थापना केली. संत नामदेवांचे "ज्ञानदीप लावू जगी" हे संस्थेचे ब्रीदवाक्ये तर बोधचिन्ह म्हणून समईची निवड केली. अनवाणी पायाने गुणवान, गरीब, होतकरू पोरांचा शोध घेत स्वतःला शैक्षणिक कार्याला वाहून घेतले. यातूनच १९५४ साली ज्ञानोद्योग विद्यालय तर १९६१ साली कळंब येथे ज्ञान प्रसारक महाविद्यालयाची (पुढे हे महाविद्यालय शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, नावाने ओळखले जाते) येथे स्थापना केली. मराठवाड्यातील ग्रामीण शिक्षण चळवळीचे प्रणेते म्हणून मोहेकर गुरूजींचा उल्लेख केला जातो. वटवृक्षाप्रमाणे संस्थेच्या 'केजी टू पीजी' अशा अनेक शाखा आज कळंब, वाशी, परंडा, औसा आणि लातूर तालुक्यात कार्यरत आहेत. यात एक वरिष्ठ महाविद्यालय, दोन प्राथमिक विद्यालये, चार कनिष्ठ महाविद्यालय, दहा माध्यमिक विद्यालय, सुविधांयुक्त विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह, तीन कर्मचारी पतसंस्था आणि ग्राहक भांडार यांचा समावेश आहे.

**- प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी**
(सहयोगी प्राध्यापक
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर
महाविद्यालय, कळंब)

## बहुजनांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा आणली...

- मोहेकर गुरुजींच्या सामाजिक तळमळीने उभा राहिलेल्या ज्ञानमंदिरातून हजारो विद्यार्थ्यांनी ज्ञानसंस्काराचे धडे घेत स्वतःला घडवले. त्यांचे दीपस्तंभासारखे कार्य जनतेच्या सदैव स्मरणात राहील. शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजनांच्या झोपडीपर्यंत आणणारे ते आधुनिक भगीरथ होते. साधी राहणी, उच्च विचारसरणी हा त्यांचा आदर्श होता. पदामुळे नव्हे कर्तुत्वामुळे नावलौकिक मिळवलेले ते व्यक्तिमत्त्व होते एक आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालक होते. अशा या आदर्श, थोर व्यक्तिमत्वास कोटी कोटी प्रणाम !!

## अण्णांचा गौरव व सन्मान

- मोहेकर गुरुजींच्या सामाजिक तळमळीने स्थापन केलेल्या शैक्षणिक ज्ञानमंदिरातून आज हजारो विद्यार्थी ज्ञानसंस्काराचे धडे प्राप्त करत आहेत. त्यांच्या यशस्वी जीवनकार्यामुळे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनी तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांनी अण्णांना अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे.
- अण्णांचे हे दीपस्तंभासारखे कार्य जनतेच्या सदैव स्मरणात राहील. अशा आयुष्यभर निःस्वार्थ शिक्षण प्रचार आणि प्रसाराचे कार्य करणाऱ्या ज्ञानदेव मोहेकर गुरुजी तथा अण्णांनी वयाच्या ६४ व्या वर्षी ३० ऑगस्ट १९९१ रोजी या जगाचा निरोप घेतला.

## महत्त्वाच्या घटना आणि प्रसंग

- प्रामाणिकपणावर अण्णांचा प्रचंड विश्वास होता. डोक्यावर शिरस्त्राण नाही, पायात पायतनही नाही, अशा अवस्थेत रानोमाळ भटकत अण्णांनी गोर-गरीब, श्रीमंत अशा सर्वच स्तरातील मुले गोळा केली. अण्णांची वसतिगृहयुक्त शाळा म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा मानबिंदू होता. त्यातूनच सुंदर कर्तबगार अशी जीवनशिल्पे घडविली.
- प्रारंभी मोहा येथे एक वसतिगृह सुरु केले. त्याकाळी अनुदान नव्हते. मुलांच्या जेवणाची सोय व्हावी म्हणून गुरुजी व त्यांचे सहकारी गावोगावी फिरुन ज्वारी,डाळ,तांदूळ जमा करुन विद्यार्थ्यांच्या जेवणाचा प्रश्न सोडवित तसेच त्याकाळी स्वयंपाकी मिळणे कठीण होते, यासाठी गुरुजी भल्यापहाटे उठून विद्यार्थ्यांसाठी स्वतः भाजी-भाकरी तयार करत.
- योगायोगाने त्याच वर्षी ग्रामपंचायतीची स्थापना झाली. लोकांनी सरपंचपदी बिनविरोध निवडून दिले आणि गावच्या कारभाराचीही जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यांच्या या समग्र शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नी सुमनबाईंची खंबीर साथ होती.
- मराठवाड्यातील ग्रामीण शिक्षण चळवळीचे प्रणेते म्हणून मोहेकर गुरुजींचा उल्लेख केला जातो. ज्ञानेश्वर माऊलीच्या शब्दांत, 'इवलेसे रोप लावियेले द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावरी' या भव्यदिव्य शैक्षणिक कार्यामध्ये ज्ञानदेव व सुमनबाई या दाम्पत्याचे मोठे योगदान व त्याग आहे. मानवी मूल्य ढळू न देता समाजहित व देश विकासाचे अलौकिक कार्य करणारी महान विभूती म्हणजे शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी.




Hello Osmanabad
Page No. 2 Aug 30, 2022
Powered by: erelego.com

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 7
17 Jul 2022

# विद्यापीठ एनएसएस पुरस्कारामध्ये मोहेकर कॉलेजचा समावेश



## डॉ. सुर्यवंशी, प्रा. राठोड, बोर्डे यांनाही पुरस्कार जाहीर

**कळंब :** औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने (२०१९-२०२०) सर्वोत्कृष्ट म हाविद्यालय पुरस्कार-शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयास जाहीर झाला आहे. तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रशंसा पुरस्कार (२०१७-१८) प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी जाहीर झाला आहे. सर्वो त्कृष्ट रासेयो कार्यक्रमाधिकारी पुरस्कार प्रा. ईश्वर राठोड, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार अनिकेत बोर्डे या विद्यार्थ्याला जाहीर झाला आहे.

सदर पुरस्काराचे वितरण २६ जुलै रोजी विद्यापीठ नाट्यगृहात होणार आहे. सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्ञानप्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, प्राचार्य डॉ. सुनील पवार यांनी अभिनंदन केले आहे. तसेच डॉ. व्ही. एस. अनिगुंठे, उपप्राचार्य डॉ. हेमंत भगवान, प्रा. डॉ. के. डी जाधव, प्रा. डॉ. दादाराव गुंडरे, प्रा. डॉ. डी. एस जाधव, प्रा. डॉ. एल. एम. थोरात, प्रा. डॉ. के. डब्ल्यू. पावडे, प्रा. डॉ. आर.व्ही. ताटीपामुल, प्रा. एन. जी. साठे, डॉ. संदीप महाजन, प्रो. डी. एन. चिंते, प्रा. डॉ. जयवंत ढोले, प्रा. डॉ. बालाजी वाघमारे, ग्रंथपाल प्रा. अनिल फाटक, सहायक ग्रंथपाल अरविंद शिंदे, संतोष मोरे, हनुमंत जाधव तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही अभिनंदन केले आहे.



Reg No MH 04D0056921

# ZEE 24 NEWS LIVE

## कोरोना योध्दा सन्मान पत्र

कोविड १९ संसर्गजन्य परिस्थिती मध्ये आपण सामाजिक बांधीलकी जपत समाज कार्यात नेहमी एक पाऊल पुढे असल्या कारणाने आपणांस ZEE 24 NEWS LIVE चॅनलचा सलाम.....

**प्रा.डॉ.दिपक सुभाषराव सुर्यवंशी** (कळंब)

संपुर्ण भारत एकजूट होऊन कोरोना महामारीशी लढत आहे.अशा कठीण परिस्थितीत आपण सर्वसामान्य नागरिकांसाठी,देशासाठी,राज्यासाठी व परिसरासाठी करत असलेले सेवाकार्य अतुलनीय आहे.

आपले कार्य अभिमानास्पद व कौतुकास पात्र आहे.या पुढे ही असेच सामाजिक बांधिलकी जपून माणुसकीचे कार्य पुढेही कार्यरत राहण्यासाठी ZEE 24 NEWS LIVE वेब पोर्टल व न्युज चॅनल परिवारा तर्फे आपणांस कोरोना योध्दा सन्मान पत्र प्रदान करण्यात येत आहे.

धन्यवाद व अभिनंदन...!

अरविंद मुरकुटे

पुरोगामी विचाराचे
एकमत

page-
11 Oct 202

▶ मला वाटते मीच चुकलो माझ्ा हा रस्ता, आयुष्याच्या वळणावरचा मी एक फिरस्ता

# कळंबमध्ये कोजागिरी पौर्णिमेनिमित्त रंगले कवी संमेलन

**सतीश टोणगे**

**कळंब** : शहरातील जिजाऊ नगर येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त राष्ट्रमाता जिजाऊ विचार मंचच्या वतीने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ. हनुमंत माने होते. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन संतोष लिमकर यांनी केले. कवी संमेलनात गझलकार शेखर गिरी, शिवराज मेनकुदळे, अश्रुबा कोठावळे, सोपान पवार, डॉ. दिपक सूर्यवंशी यांनी कविता सादर केल्या.



शेखर गिरी यांनी उत्तम अशा गजल सादर करून श्रोत्यांचे मने जिंकली. एका गजलमध्ये ते म्हणतात,

खांद्यावरून मजला घेऊन जात होते
डोळ्यांत आसवे अन्
आतून गात होते

दिवसा किती जरी ते पापात डुंबलेले
रात्रीस पुण्य म्हणुनी ते किर्तनात होते

शिवराज मेनकुदळे यांनी काजळ ही कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संतोष लिमकर यांनी माझ्या गावात ही कविता सादर केली. ते म्हणतात

तोच रस्ता तिच गल्ली
आवाजाची तिच धून
आज कसे काही दिसेना
आवाजाची एकही खूण
मला वाटते मिच चुकलो
माझा हा रस्ता
आयुष्याच्या वळणावरचा
मी एक फिरस्ता....

सोपान पवार यांनी पाऊस तर डॉ. हनुमंत माने यांनी कोरोना या विषयावर कविता सादर केली. अश्रुबा कोठावळे यांनी सुंदर कविता सादर केली. प्रा. डॉ. दिपक सूर्यवंशी यांनी माझे दैवत, माझी आई ही आपली बहारदार काव्यरचना सादर केली. शेखर गिरी यांनी गजल सादर करून श्रोत्यांचे मने जिंकली. एका गजलमध्ये ते म्हणतात, खांद्यावरून मजला घेऊन जात होते, डोळ्यांत आसवे अन् आतून गात होते, दिवसा किती जरी ते पापात डुंबलेले, रात्रीस पुण्य म्हणुनी ते किर्तनात होते

कार्यक्रमासाठी लहू कावळे, भागवत इंगळे, बिभिषण मोहिते, सतीश देशमुख, हनुमंत झांबरे, अरविंद गायकवाड, राजेश ढेंगळे, बालाजी पवार, आप्पासाहेब वाघमोडे, अनंत नरवडे, विनायक आवाड यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक राजेंद्र बिक्कड, सूत्रसंचालन लक्ष्मण लाखे व आभार विक्रमादित्य मोरे यांनी मानले.



# क्रांतिरत्न महाग्रंथ

**महात्मा जोतीराव फुले, सावित्रीआई फुले जीवन-कार्य-विचार दर्शन १००० पानांचा महाग्रंथ**


## निर्मिती मंडळ

**राजेश खवले**
Mob.9850345176

**राहुल तायडे**
Mob.9423847149

**विजय लोखंडे**
Mob.8788986130

**प्रताप वाघमारे**
Mob.9422642842

**अतुल दोड**
Mob.8793002424

**प्रकाश अंधारे**
Mob.8494906992


प्रिय,

आपणास कळविण्यास आनंद होतो की महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांचे जीवन, कार्य ,विचार याचे दर्शन घडविणारा एक हजार पानांचा महाग्रंथ 'क्रांतिरत्न' या नावाने प्रकाशित होत आहे. याबाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

उपजिल्हाधिकारी राजेश खवले, जिल्हा खनिकर्म अधिकारी अतुल दोड, शिक्षणाधिकारी प्रकाश अंधारे, तहसीलदार विजय लोखंडे, तहसीलदार राहुल तायडे, तहसीलदार प्रताप वाघमारे यांनी स्वखर्चाने या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतलेली आहे.

या ग्रंथाच्या संपादनाकरीता एक संपादक मंडळ गठित केले जाणार आहे. संपादक मंडळामध्ये महात्मा फुले सावित्रीआई फुले यांचेवर संशोधन केलेले विद्वान, संशोधक, प्राध्यापक, लेखक असणार आहेत. तसेच मान्यवर विद्वानांचे एक मार्गदर्शक मंडळ देखील असणार आहे.

- या ग्रंथाच्या निर्मितीकरिता कोणतीही वर्गणी गोळा केल्या जात नाही. कोणतेही आर्थिक सहयोग मागितल्या जात नाही.
- ग्रंथामध्ये लेख लिहिणाऱ्या लेखक अथवा लेखिकेला ग्रंथाची एक प्रत विनामूल्य पाठविला जाणार आहे.
- या ग्रंथाचे प्रकाशन एकाच दिवशी एकाच वेळी १०० ठिकाणाहून करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
- या ग्रंथा करिता आपण या क्षेत्रातील विद्वान व्यक्ती म्हणून लेख लिहावा अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

लेख लिहिताना खालील बाबींचे अनुपालन व्हावे अशी ही नम्र विनंती आहे.

लेख हा चरित्रात्मक नसावा. महात्मा फुले,सावित्रीआई फुले यांचे जीवन, कार्य व विचार यातील विशिष्ट पैलू निवडून त्यावर लेख लिहिण्यात यावा.कोण कोणत्या विषयावर लेख लिहिला जाऊ शकतो याची कल्पना यावी म्हणून प्रस्तावित विषयांची विषयसूची सोबत जोडलेली आहे.

लेखामध्ये मांडणी ससंदर्भ करण्यात यावी. कोणता मुद्दा कुठून घेतलेला आहे यावर वाद निर्माण झाल्यास त्याबद्दलचे प्रमाण आपल्याकडे उपलब्ध असेल याबाबतची खात्री बाळगण्यात यावी.

यापूर्वी महात्मा फुले, सावित्रीआई फुले यांच्यावर कधीही एक हजार पानांचा ग्रंथ निघालेला नाही. हा ग्रंथ एक ऐतिहासिक कामगिरी आहे. करीता या ग्रंथामधील लिखाण हे वैचारिक स्वरूपाचे असेल, ससंदर्भ असेल तसेच भविष्यातील अनेक पिढ्यांना संशोधन करताना हा ग्रंथ संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडणार आहे. या बाबी मनामध्ये ठेवून लेखांचे लिखाण करण्यात यावे.

लेख हा कमीत कमी दीड हजार शब्द आणि जास्तीत जास्त पाच हजार शब्दांचा असावा. विषयाची व्याप्ती विचारात घेता शब्दमर्यादा मागेपुढे झाल्यास काळजी करू नये.लेख ३१ मार्च २०२० पूर्वी पाठविण्यात यावा.

लेख टंकलिखित करून पाठवत असल्यास तो युनिकोड फॉन्ट मध्ये पाठविण्यात यावा.

rajesh.khawale@gmail.com या ईमेलवर लेख पाठविता येईल. व्हाट्सअप वर लेख पाठवायचा झाल्यास ९८५०३४५१७६ या क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे लेख पाठविता येईल.

या ऐतिहासिक महाग्रंथा करिता लेख लिहून आपण आपले वैचारिक योगदान द्यावे अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपला स्नेहांकित

**डॉ. दीपक सूर्यवंशी**
(मार्गदर्शक)
'क्रांतिरत्न' महाग्रंथ

Gravity Publication ग्रॅव्हिटी पब्लिकेशन Mob.7558420412 Email : gravitypublication@gmail.com

ात मने या
ीने, मला
ाडेल असे

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतांना डॉ.कलमांची प्राणज्योत मालवली! एक सच्चा शिक्षक, महान देशभक्त, प्रेरणादायी

जयंतीदिनी नवा, स्वावलंबी, सहिष्णू, प्रज्ञावंत भारत घडविण्याचा संकल्प करूयात! जय हिंद! जय भारत!

# स्पर्धा परीक्षेत हमखास यशासाठीचा दस्तावेज : ज्ञानराज मराठी व्याकरण

**पुस्तक परिक्षण**

**प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी**

मो.नं. ९२८४७ ०७५३२

आमचे सन्मित्र प्रा.ज्ञानेश्वर आघाव ( ज्ञानराज अकॅडमी, बालिकाश्रम रोड, अहमदनगर ) गत पंधरा वर्षापासून ते स्वतंत्र अकॅडमीच्या माध्यमातून हे स्पर्धा परीक्षा अध्यापन करतात, मराठी व्याकरणावर सूक्ष्म निरीक्षण मांडणारे ते जाणकार अभ्यासक आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी आज शासकीय निमशासकीय विविध पदावर कार्यरत आहेत, त्यांनी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी ज्ञानराज मराठी व्याकरण' यावर अभ्यासपूर्ण ग्रंथ आकारास आणला आहे. भाषा आणि माणूस यांचं अतूट नाते आहे. भाषा खरेतर अनेक मानवी समूहाला जोडणारा तो एक पूल आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासात भाषा महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. म्हणूनच चाकाच्या शोधापेक्षा भाषेचा शोध खूप महत्त्वाचा मानला जातो. कोणत्याही भाषेची शास्त्रीय बैठक ही तिच्या व्याकरणावर आधारीत असते. व्याकरण हा भाषेचा कणा आहे, असे मानल्यास वावगे ठरणार नाही. भाषेतील चौदाखडीपासून ते वाक्य, शब्द संग्रहाची शास्त्रीय माहिती असावी लागते. अलीकडच्या काही वर्षांमध्ये अनेक ज्ञानशाखा निर्माण झाल्या तर काही ज्ञानशाखा मागेही पडल्या. पण या घडामोडीत भाषेचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकच ठळकपणे अधोरेखित होत गेले. भाषा कधी माध्यम तर कधी साधन बनून ज्ञानक्षेत्रांच्या विकासात मौलिक योगदान देत राहिली. परंतु भाषेच्या क्षमतांचा, तिच्या सर्वस्तरीय उपयोजनाचा स्वतंत्र विचार होताना दिसत नाही. तो झाला पाहिजे.

ऋआकृतिबंध :- भाषा, तिची पूर्वपीठिका, शब्द निवडीपासून ते लिंग, वचन,काळ, संधी, समास आणि जनरल नॉलेज या मूलभूत घटकांचा यांत समावेश केला आहे. भाषेवर प्रभुत्व संपादन करून कोणतीही व्यक्ती सर्वांगीण प्रगती करू शकते. विविध क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरू शकते. त्यासाठी भाषा आणि भाषिक कौशल्यांचे शिक्षण खूप आवश्यक आहे. ते घेऊन व्यक्ती स्वत:चा विकास करून घेऊ शकते. सर्वच भाषिक कौशल्ये विविध क्षेत्रात काम करण्यासाठी आत्मविश्वास देतात. व्याकरणविषयक अगदी सोप्या भाषेतून विविध संकल्पना स्पष्ट आणि उपयोजित लेखनावर आधारित परिपूर्ण माहिती व्हावी, याहेतूने ज्ञानराज मराठी व्याकरण' याकरीता संपादन करण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्ञानराज मराठी व्याकरण' हा ग्रंथ स्पर्धा परीक्षाची तयारी करणाऱ्या तमाम अभ्यासकांसाठी असलेला हा ग्रंथ तीर्थरूप आक्कास (आईस) मनोभावे अर्पण केला आहे. ध्येयवादी तरुण पिढीसमोर निर्माण केलेले आशावादाचे चित्र या ग्रंथाची जमेची बाजू असल्याचे त्यात दिसते. केवळ हा ग्रंथ वाचनीय नाही, तर दिशादर्शक आहे ते वाचून नवी शक्ती, उमेद आणि लढण्याची वृत्ती वाढते. थोडक्यात प्रा.ज्ञानेश्वर कांताबाई सुभाषराव आघाव यांनी विद्यार्थ्यांसाठी सोप्या भाषेतून व्याकरणाची तयारी व्हावी यासाठी परिपूर्ण एकच असे पुस्तक लिहिलेले आहे.

*निर्मितीमूल्य :- आकर्षक मुखपृष्ठ, सुंदर छपाई अशा बहिरंग व अंतरंगाने नटलेल्या या दस्तावेजाची, अभ्यासकाना पाहताक्षणीच भुरळ पडली नाही, तरच नवल ! पुस्तकाचा आकृतिबंध आहे. भाषेचा आरंभ-मध्य-शेवट, व्याकरणाची आवश्यकता, विषय घटक मांडणी, व्याकरणिक मापदंडातून ती दर्जेदार कलाकृती ठरली असून स्पर्धा परीक्षाची दिशा निश्चितच यातून प्राप्त झालेली आहे, असा आशावाद वाटतो. त्यांच्या साहित्यिक प्रवासास अनेकोत्तम शुभेच्छा खख

लेखक : प्रा.ज्ञानेश्वर आघाव / ज्ञानराज मराठी व्याकरण/ पृष्ठे : २४८ , मूल्य : २४० /-

संपर्क मो:- ८६९८ ९४४०९१

मुखपृष्ठ:अभिजित कुंभार

प्रकाशक-नितेश सूर्यवंशी-रडीकॅल पब्लिकेशन, पुणे

---

डत आहे
.तो सुदृढ
पाहिजे.
स्कृतिक,
ने केलेला
भारताचा

भारतीय
ांस्कृतिक
ा सुरुंग
अतिशय
कुजबुज
जाहीरता
ारी केवळ
काँग्रेसची
ा स्वातंत्र्य
ाह होता

.ती म्हणजे ( १) देशाच्या विविध भागातील राष्ट्रवादी राजकीय कार्यकर्त्यांमध्ये मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यास उत्तेजन देणे .(२) जात, धर्म, प्रांत भेद विरहित राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेचा विकास करणे.(३) महत्त्वाच्या निगडीच्या प्रश्नांवरील लोकांच्या मागण्या सरकार पुढे मांडणे.(४) देशात विविध प्रश्नांवर लोकमत तयार करणे आणि त्यांचे संघटन करणे. ब्रिटिश राजवटीच्या काळात ब्रिटिशांविरोधी लढ्याचा तो एक राजकीय आवाज होता. आज भारत जोडो यात्रा एतद्देशीय सरकारच्या हुकूमशाही व मनमानी धोरणाविरोधात आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना स्वातंत्र्याच्या सर्व मूल्यांची मोडतोड व तोडफोड केली जात आहे.या पार्श्वभूमीवर अनेक अर्थाने महत्त्वाची ठरू शकते.

गीते ,स्वातंत्र्याचे पोवाडे, व्याख्याने, शिबिरे या आधारे काँग्रेस सेवा दलाने अतिशय भरून स्वरूपात काम केले. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस सेवा दल संघटनेची गरज असून सुद्धा ती दुर्लक्षित आणि कमजोर झाली. पक्षीय कार्यकर्त्यांच्या प्रबोधनाकडे, सेवावृत्तीकडे ,दलवृत्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे काँग्रेसची पक्ष म्हणून कमालीची दुरावस्था झाली. आज झालेली अवनती हे त्याचेच कारण आहे. म्हणूनच भारत जोडो यात्रेच्या निमित्ताने काँग्रेसने पक्ष म्हणून उभारी घेण्याबरोबरच काँग्रेस सेवा दलाची उभारणीही करण्याची गरज आहे. नव्याने निवडून येणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. भारत जोडो यात्रेतून हा संदेश स्वीकारणे ही पक्ष नेतृत्वाची, पक्षाची आणि आजच्या अस्वस्थ

# मोहेकर महाविद्यालयास सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून पुरस्कार प्रदान




कळंब दि. २८ (प्रतिनिधी) राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या वतीने रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रशंसा पुरस्कार (२०१७-१८) प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी प्रदान करण्यात आला आहे. तसेच (२०१९-२०२०) सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयास प्रदान करण्यात आला आहे. सर्वोत्कृष्ट रासेयो कार्यक्रमाधिकारी पुरस्कार- प्रा. ईश्वर राठोड, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार अनिकेत बोर्डे या विद्यार्थ्याला प्रदान करण्यात आला. सदर पुरस्काराचे वितरण २६ जुलै रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. डॉ. प्रमोद येवले, रासेयो राज्य समन्वयक प्रमोद बणजे, माजी संचालक टी.आर. पाटील, रासेयो संचालक डॉ. आनंद देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. अत्यंत मानाचे प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार मिळाला त्याबद्दल ज्ञानप्रसारक मंडळ संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, प्राचार्य डॉ. सुनील पवार यांनी अभिनंदन केले आहे. तसेच उपप्राचार्य डॉ. हेमंत भगवान, प्रा. डॉ.के डी जाधव, प्रा. डॉ. दादाराव गुंडरे, प्रा. डॉ. डी एस जाधव, प्रा.डॉ.एल.एस.थोरात, प्रा. डॉ. के डब्ल्यू. पावडे ,प्रा. डॉ. आर व्ही तातीपामुल, प्रा. एन जी साठे, डॉ. संदीप महाजन, प्रो.डी.एन. चिंते, प्रा.डॉ.जयवंत ढोले, ग्रंथपाल प्रा अनिल फाटक, सहायक ग्रंथपाल अरविंद शिंदे, संतोष मोरे, हनुमंत जाधव तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही अभिनंदन केले आहे.

दिव्य मराठी
औरंगाबाद जिल्हा 17-10-2022

औरंगाबाद जिल्हा

# मोबाइल ॲडिक्शन, मासिक पाळीविषयी जनजागृती

**प्रतिनिधी** | औरंगाबाद

राज्य सरकारने कोरोनाकाळात शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाइन शिक्षण सुरू केले होते. मात्र, त्यातून सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचलेच नाही. पण, अति मोबाइलचा वापर आणि त्याचा तरुणावर कसा परिणाम झाला हे मुकाभिनयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सादर केले.

गेवराई येथील आर. बी. अटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मासिक पाळीविषयी असलेली जुनाट विचारधारा व आरोग्य सुरक्षिततेवर मुकाभिनयातून जनजागृती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा युवा महोत्सव रविवारपासून सुरू झाला. उद्घाटन सोहळ्यानंतर स्टेज क्रमांक ३ वरील नाट्यरंग मंचावर मुकाभिनयाचे आयोजन केले होते. यंदा या कलाप्रकारात कलावंतांनी कोरोनाकाळातील महामारीमुळे निर्माण झालेल्या समस्यांबरोबरच ध्वनी प्रदूषण अन् मासिक पाळीविषयी मुकाभिनयातून जनजागृती केली. यात पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'मोबाइल ॲडिक्शन'मुळे होणारे परिणाम मुकाभिनयातून दाखवले. कळंब येथील मोहेकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डीजेच्या आवाजामुळे होणारे आरोग्यावरील परिणाम सांगितले.

# लेखकांनी मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्य लेखन करावे-रमेश बोर्डेकर




**कळंब – समय सारथी**

**साहित्य समाजाचा आरसा असतो, जीवनाचे अनेक प्रतिबिंब त्यात उमटत असते. जे भावले ते लिहिले, या पद्धतीचे साहित्य असावे लागते. मानवी जीवनातील दुःखाचे चिंतन करणारे माणूस केंद्रित साहित्य दर्जेदार असते. म्हणजेच लेखकांनी मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्य लेखन करावे,असे मत रमेश बोर्डेकर यांनी व्यक्त केले.**

१३ऑक्टोंबर रोजी शैक्षणिक वर्ष -(२०२२-२३) शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळ- उद्घाटन समारंभ सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये भाषा वाङ्मय मंडळ असणे अनिवार्य आहे आणि त्याव्दारे भाषेचे संगोपन आणि संवर्धन करण्याचे निर्देश आहेत. म्हणून अशा प्रकारचे मंडळ विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करून देणे, ही बाब विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत महत्वाची आहे.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रध्दास्थान कै. ज्ञानदेव मोहेकर गुरुजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि वृक्षाला पाणी घालून मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

संस्थेचे सचिव डॉ.अशोकराव मोहेकर यांच्या मार्गदर्शनातून विभागातील प्राध्यापकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यासाठी अनेक नामांकित पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी आणि साहित्यिक मा. श्री रमेश बोर्डेकर हे मुख्य अतिथी म्हणून तर प्रा.पंडित शिंदे, प्रा. रफिक चौधरी हे विशेष अतिथी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एच.के.भगवान यांची उपस्थित होते.

प्रमुख उपस्थितीमध्ये प्रोफेसर मुकुंद गायकवाड , डॉ. दादाराव गुंडरे, प्रा.एच. जे.काजी, प्रा.भिसे आदी उपस्थित होते. यानिमित्ताने मराठी, हिंदी व इंग्रजी विभागातील विद्यार्थांच्या शब्दफुलोरा भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.डी.एस. साकोळे सूत्रसंचालन प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. के. डी.जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. नितीन अंकुशराव, प्रा. काकडे, डॉ. मीनाक्षी जाधव, डॉ. रोहिणी लोहकरे, प्रा. बालाजी बाबर, प्रा.अमोल शिंदे,प्रा.आर.जी. ताटीपामुल, प्रा.सुशील जमाले, प्रा.शाहरुख शेख, डॉ.नामानंद साठे,प्रा.बालाजी वाघमारे, श्री संदीप सूर्यवंशी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांची भूमिका महत्त्वाची : पी. एस. शिंदे



**कळंब** : आजच्या वर्तमानकाळात शिक्षकांची भूमिका ही अधिक महत्त्वाची ठरत आहे. त्यांनी केलेल्या संस्कारावरच हे तरुण पिढी पुढे जात असून, विविध स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनामधूनच हे विद्यार्थी घडत आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे कौतुक करत असताना शिक्षकांची भूमिकासुद्धा तितकीच महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन पी. एस. शिंदे म्हणाले. गुणवंताच्या गुणगौरव सोहळा पार पडला यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी अप्पासाहेब लहाने, प्रा. डॉ. दादाराव गुंडरे यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे प्रबोधन केले. व्यासपीठावर प्रा. डॉ. अनंत नरवडे, डॉ. दिपक सूर्यवंशी, देशमुख उपस्थित होते.

यावेळी इयत्ता दहावी, बारावी व नीट परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंताचा गुणगौरव सोहळा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार राष्ट्रमाता जिजाऊ विचार मंच यांच्या वतीने करण्यात आला. यात लहू कवळे, प्रा. डॉ. दादाराव गुंडरे, प्रा. डॉ. दिपक सूर्यवंशी आदींचा सत्कार करण्यात आला.

सोहळ्यात नीट २०२२ यशाबद्दल आदित्य बाभळे, ओम गाढवे, आशिष आमले, अभिजित नरवडे, श्रेया झांबरे, शुभम झांबरे, वेदिका मायचारी, ऋतुजा साबळे, पूजा गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. १० वी यशाबद्दल श्रुती खाडे, प्रज्ञा मेनकुदळे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी बिभीषण मोहिते, सतीश देशमुख, भागवत ढगळे, राजेंद्र ठिकरद, बालाजी पवार, राजेश ढेंगळे, अशोक आमले, हनुमंत झांबरे आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक विनायक आबाड, सूत्रसंचालन संतोष लिमकर यांनी तर उपस्थितांचे आभार विक्रमादित्य मोरे यांनी मानले.

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक ३०८ ) मंगळवार दि.१३/०९/२०२२ पान ०४

# जिजाऊ नगर विचारमंचच्या वतीने प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी यांचा सत्कार



कळंब : दि.१२ ( रयतेचा कैवारी, प्रतिनिधी ) मराठी साहित्य महामंडळ, नागपूरचा रा. ग. जाधव राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्कार मिळाला तसेच ज्ञान प्रसारक मंडळाचा (शैक्षणिक वर्ष-२०२२) ज्ञानदीप पुरस्कार मिळाला. त्याबद्दल त्याबद्दल शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयातील प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी यांचा विशेष सपत्निक सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विचारमंचावर श्री रमेश लहाने, प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी, प्रा.डॉ. दादाराव गुंडरे, प्रा. डॉ.अनंत नरवडे, श्रीमती देशमुख उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री पी. एस. शिंदे उपस्थित होते.यावेळी इयत्ता दहावी, बारावी व नीट परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंताचा गुणगौरव सोहळा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.यांत श्री लहू कावळे, प्रा.डॉ दादाराव गुंडरे यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल -रुक्मिणीच्या दर्शनाने करण्यात आले.या सत्कार समारंभाचे प्रास्ताविक श्री विनायक आवाड यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक श्री संतोष लिमकर यांनी तर उपस्थितांचे आभार श्री विक्रमादित्य मोरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री बिभीषण मोहिते, श्री नामदेव तोडकर, श्री भागवत इंगळे, श्री राजेंद्र बिक्कड , श्री जोतीराम जाधव, आदींनी परिश्रम घेतले. तसेच याप्रसंगी जिजाऊ नगरीतील नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती

# लेखकांनी मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्य लेखन करावे-बोर्डेकर





कळंब दि.१३ (वार्ताहर): साहित्य समाजाचा आरसा असतो, जीवनाचे अनेक प्रतिबिंब त्यात उमटत असते. जे भावले ते लिहिले, या पद्धतीचे साहित्य असावे लागते. मानवी जीवनातील दुःखाचे चिंतन करणारे माणूस केंद्रित साहित्य दर्जेदार असते. म्हणजेच लेखकांनी मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्य लेखन करावे,असे मत श्री रमेश बोर्डेकर यांनी व्यक्त केले.

१३ऑक्टोंबर रोजी शैक्षणिक वर्ष -(२०२२-२३) शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात भाषा वाङ्मय मंडळ- उद्घाटन समारंभ सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये भाषा वाङ्मय मंडळ असणे अनिवार्य आहे आणि त्याव्दारे भाषेचे संगोपन आणि संवर्धन करण्याचे निर्देश आहेत. म्हणून अशा प्रकारचे मंडळ विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करून देणे, ही बाब विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत महत्वाची आहे.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रध्दास्थान कै. ज्ञानदेव मोहेकर गुरूजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि वृक्षाला पाणी घालून मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

संस्थेचे सचिव डॉ.अशोकराव मोहेकर यांच्या मार्गदर्शनातून विभागातील प्राध्यापकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यासाठी अनेक नामांकित पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ

▶▶ पान ३ वर